संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

अंतर्गत

# या.द.व. देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमीत कार्यक्रम

## २०१५-१६

# निबंधात्मक अहवाल

(फोटोसह)

| | | |
|---|---|---|
| कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना<br>या.द.व. देशमुख महाविद्यालय<br>तिवसा, जि. अमरावती | महिला कार्यक्रम अधिकारी<br>प्रा. डॉ. एस. एस. भूयार | प्राचार्य<br>या.द.व. देशमुख कला व वाणिज्य<br>महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती |

# रा.से.यो. नियमीत कार्यक्रम अहवाल (२०१५-१६)

सत्र २०१५-१६ मधील नियमित कार्यक्रमाअंतर्गत जे उपक्रम राबविल्या गेलेत त्या संपूर्ण उपक्रमांचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**१) आंतरराष्ट्रीय योगा दिनः-**

२०१५-१६ च्या कृतिआराखड्यानुसार शक्य होईल तशा कार्यक्रमांचे आयोजन करून रा.से.यो. च्या उद्दिष्टांनूसार प्रयत्न केलेत. त्यांचा कार्यक्रमानूसार अहवाल पुढीलप्रमाणे सादर आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे शनिवार दि. २० जून २०१५ ला आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करायचे होते. त्याकरिता मा. प्राचार्य डी.एच.मेश्राम सरांनी अगोदरल्या दिवसी म्हणजे शुक्रवार दि. १९ जून २०१५ लाच रा.से.यो.द्वारे पूर्वतयारी करायला सांगितले होते. त्याप्रमाणे मुलींच्या वसतिगृह इमारतीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाच्या हॉलमध्ये पूर्वतयारी केली होती. शनिवार दि. २० जून २०१६ ला मा. मेश्राम सरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शारीरिक शिक्षण संचालिका कु. रुपाली ढोणे (सौ.इंगोले) यांनी अत्यावश्यक पण सोपे योगा करुन दाखविले. त्याप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मच्यारी त्याचप्रमाणे काही स्वयंसेवक आणि विद्यार्थी सुद्धा या कार्यक्रमाध्ये सहभागी झाले होते. योगा प्रत्याक्षिक कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. शेवटी सर्वांना चहापाणी घेतले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

**२) रा.से.यो.विभागाची सत्रारंभ सभाः-**

राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०१५ ला. सत्र २०१५ -१६ च्या पहिल्या सभेचे आयोजन केले होते. या सभेकरिता कार्यक्रम अधिकारी प्रा.सा.जी.सोळंकेहजर होते. या सभेमध्ये प्रथम सत्रात रा.से.यो. समन्वयक प्रा. डॉ. गणेश मालटे, मा.कुलगुरु डॉ. मोहन खेडकर , मा.ना. रंजित पाटील यांची मार्गदर्शनपर भाषण झालीत. त्याचप्रमाणे दुसऱ्या सत्रात चार जिल्ह्यांच्या चार जिल्हासमन्वयकांनी आपापली मते मांडली. दरम्यान काही कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला होता. श्री. राजेश पिददी यांनी दरवर्षीप्रमाणे आवश्यक माहिती सादर केली. सभेच्या

समारोपानंतर २०१२-१३ व २०१३-१४ च्या सत्रांमधील राहिलेल्या अनुदानाचे चेक अदा करण्यात आले. होते.

**३) स्वातंत्र्य दिनी वृक्षारोपण :-**

शनिवार दि. १५ ऑगस्ट २०१५ ला ध्वजारोहणच्या कार्यक्रमानंतर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करण्याचे मत मा. प्राचार्यांनी व्यक्त केले होते. त्याप्रमाणे रा.से.यो. ने अगोदरल्या दिवशी शुक्रवारी दि. १४ ऑगस्टला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिका शिवणगाव येथून रोपे बोलावलीत आणि वृक्षारोपण करण्याच्या जागेवर खड्डे खोदून घेतले. संगोपनाच्या अभावाने मागील वर्षीची रोपे ज्या लागवड ठिकाणी जळाली होती, त्या ठिकाणी आणि नवीन आवश्यक जागेवर स्वातंत्र्य दिनी वृक्षारोपनाचा कार्यक्रम पार पडला रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी मा. प्राचार्य मेश्राम सर कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी.सोळंके महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संगिता भूयार यांचेसह प्रा. जगताप डॉ. गायकवाड, प्रा. वाघमारे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. काळे प्रा. गावंडे, प्रा. राऊत प्रा.काळकर, प्रा.डॉ. गिरी. शा.शि.संचा.कु. टोणे इत्यादी शिक्षक कर्मचाऱ्यासोबत वृक्षारोपणाच्या कार्याला उपस्थित राहून सहकार्य केले होते.

**४) शिक्षक दिनानिमित्त श्रमदान :-**

शनिवार दि. ५ सप्टेंबर २०१५ ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये हरार्पणाचा कार्यक्रम विविध सांस्कृतिक विभागाचे (इ.सी.ए.) व रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. मुख्य कार्यक्रमानंतर रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणची रोपे चिमली होती तेथे पुनः रोपे लावली. मागील वर्षाची वाचलेली रोपे जिवंत ठेवण्याकरिता सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला.

**५) पोळ्याऐवजी श्रमदान :-**

शनिवार दि. १२ सप्टेंबर २०१५ ला पोळ्याच्या दिवसी श्रमदानाचे आयोजन केले होते. चालू सत्राकरिता ज्या विद्यार्थ्यांची रा.से.यो.मध्ये निवड करायची होती. त्या-त्या विद्यार्थ्यांना पूर्वसूचना देवून पोळ्याच्या दिवसी होणाऱ्या श्रमदानामध्ये सहभागी होण्याचे आव्हान केले होते. त्याप्रमाणे बहुतांश विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी गाजर गवत व प्लॅस्टिक कचऱ्याचे

अल्पसा संवाद साधण्याचा प्रयत्न झाला. शेवटी श्री. धोटे यांनी अंद्धश्रद्धेवर भाषण करून प्रमाण सादर केलेत. तिवसा महाविद्यालयाचा नंबर येईपर्यंत समारोपाचा वेळजवळ आला होता. त्यामुळे प्रा. सोळंके व डॉ. भूयार यांनी मधात प्रश्न विचारण्याचे प्रयत्न केलेत. मा. भुईभार यांनी समाधान करुन सभेला सल्लाही दिला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. मिरगे यांनी व आभार महा.च्या रा.से.यो. कार्य अधिकाऱ्यांनी केले.

**९) महाप्रसाद वाटण्याचे श्रमदानः-**

शनिवार दि. ३१ ऑक्टोंबर २०१५ ला शंभर रा.से.यो. स्वयंसेवकांनी गुरुकुंज आश्रम येथे महाप्रसाद वाढण्याचे श्रमदान केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांना मोफत महाप्रसादाचे जेवण असते. हे महाप्रसादाचे जेवण वाढण्याकरिता अनेक शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी संस्थाप्रमुखाचे वतिने स्वेच्छेने तयारी दाखवितात त्याचप्रमाणे पुण्यतिथी महोत्सवातील भोजन समितीन पुर्वीच कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य यांच्याशी चर्चा करुन महाप्रसाद वाढण्याचे नियोजन केले होते. ठरल्या दिवसी कार्यक्रम अधिकारी, महिला कार्यक्रम अधिकारी तसेच महिला सहकार्यक्रम अधिकारी १०० रा.से.यो. स्वयंसेवक व स्वयंसेवकांसह सर्वांनी महाप्रसाद वाढण्याचे ठिकाणी सतत तीन तास श्रमदान केले होते. यावेळी भोजन समितीने महाविद्यालयाचे आणि सहकार्य करणाऱ्या स्वयंसेवकांचे आभार व्यक्त केले आणि सर्वांना गोड पदार्थाचा प्रसाद दिला.

**१०) संविधान सन्मान रॅली व समारोपीय कार्यक्रमः-**

गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०१५ ला रा.से.यो.ने डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंच तिवसा यांचे संयुक्त विद्यमाने सहकार्याने संविधान सन्मान रॅलीचे आयोजन केले होते.



निर्मूलन करण्याकरिता श्रमदान केले शेवटी स्वयंसेवकांना चहा नास्ता देण्यात आला. बैल बनविण्यायोग्य मातीने झाडांना पाणी मिळण्याकरिता आळे केले. काही झाडांची उखरी केली.

**६) रा.से.यो. स्थापना दिन :-**

गुरूवार, दि. २४ सप्टेंबर २०१५ ला महाविद्यालयामध्ये रा.से.या स्थाना दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाकरिता बाहेरील वक्ता बोलावण्याऐवजी रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी यांनी रा.से.यो. स्वयंसेवकांना रा.से.यो.ची ध्येयधोरणे व उद्दिष्टे समजावून सांगितली. त्याचप्रमाणे मा. प्राचार्यांनीसुद्धा रा.से.यो. स्वयंसेवकांचे वेगळेपण वर्ण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी लांजेवार व आभार प्रदर्शन लांडगे यांनी केले.

**७) म. गांधी व ला.ब.शस्त्री जयंतीनिमित्त श्रमदान :-**


शुक्रवार दि. २ ऑक्टोंबर २०१५ रोजी महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंती दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये रा.से.यो. स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केल्यानंतर प्रतिमांचे पूजन केले. प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी. सोळंके यांना माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि महात्मा गांधी यांच्या जीवनावर थोडक्यात माहिती दिली. त्याचप्रमाणे दोन्ही थोर पुरूषांच्या जीवनातील त्यागाचे राष्ट्रप्रेमाचे महत्त्व पटवून दिले. लालबहाद्दूर शास्त्री यांच्या 'जय जवान जय किसान' व महात्मा गांधी यांच्या 'अहिंसा परमोधर्म' या ब्रीद वाक्यांचे महत्त्व समजावून सांगितले. शेवटी सर्वांना व चहा देण्यात आला.

**८) संस्थेच्या रा.से.यो.समिती सभाः-**

राष्ट्रीय सेवा योजना समिती श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारे मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०१५ ला कार्यक्रम आधिकाऱ्यांची 'संवाद' सभा आयोजित केली होती. ही सभा श्री शिवाजी कृषी महाविद्यालय मोर्शी रोड अम. येथे संपन्न झाली होती. सभेला महाविद्यालयामधून कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी. सोळंके आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संगीता भूयार हे उपस्थित होते.

या सभेमध्ये पहिल्या सत्रात समितीचे अध्यक्ष मा. महादेवराव भुईभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चिकले व रा.से.यो. समन्वयक प्रा.डॉ. गणेश मालटे याची भाषणे झालीत दुसऱ्या सत्रामध्ये कार्यक्रम अधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण, आगळेवेगळे असे कार्य सांगून उपस्थितांशी


या रॅलीचा समारोपीय समारंभ मा. प्राचार्य प्रा. डी. एच. मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयामध्ये पार पाडला. या कार्यक्रमामध्ये मा. गिरीश धायगुडे उच्चश्रेणी गटविकास अधिकारी पंचायत समिती तिवसा. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितीत होते तर ॲड. दिलीप कोहळे आणि तसेच मा.दिलीप काळबांडे समाजकल्याण, मा.वैभव वानखडे सभापती जि.प., नगरसेवक, मा.संजय देशमुख जि.प.सदस्य हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच मा.भुषण यावले, मा.धनराज भूला माजी सरपंच, यांनीसुद्धा निमंत्रणाप्रमाणे हजेरी लावली कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी. सोळंके, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे अध्यक्ष राजमाधरे, सागर भोवते, सुरज दहाट रा.से.यो. तुकडोजी महाराज युवक विचार मंचचे अमर वानखडे रॅली यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. तिवसा गावातील सहभागी शाळा, महाविद्यालयांचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रा.से.यो. स्वयंसेवकासह विद्यार्थी आवर्जुन मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



**११) एड्स जनजागृती कार्यक्रम :-**


मंगळवार दि. १ डिसेंबर २०१५ ला महाविद्यालयामध्ये एडस् जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. एच.आय.व्ही. एडस् बाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने डॉ. देऊळकर, डॉ. मेश्राम, यांना विषेशत्त्वाने निमंत्रित केले होते. यांचेसोबत समुपदेशक अफसर पठाण त्याचप्रमाणे कु. पुनम गजभिये, कु. मंगला बेरकर ह्या सुद्धा उपस्थित होत्या. ही चमू ग्रामीण रुग्णालय तिवसामधील होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.संगीता भुयार होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.जी.सोळंके यांनी केले

आणि सूत्रसंचालन कु. शुभांगी लांजेवार बी.ए. २ तर आभार प्रदर्शन कुणाल राऊत बी.ए.२ यांने केले या कार्यक्रमाला विचार पिठावर प्रा.उमेशकडू आणि शा.शि.सं.रुपाली टोणे हे निमंत्रणाप्रमाणे उपस्थित होते.




**१२) आरोग्य शिबिर :-**

रविवार दि. ६ डिसेंबर २०१५ ला रेड रिबन क्लबच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त रा.से.यो. आणि ग्लोबल पेन रिलिफ फाउंडेशन नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.




या शिबिराच्या उद्घाटनाकरिता मा. संजय देशमुख सामाजिक कार्यकर्ते तसेच लढा संघटना प्रमुख हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांचे सोबत त्यांच्या अर्धांगिणी सौ.गौरीताई संजय देशमुख ह्या सुद्धा उपस्थित होत्या. या आरोग्य शिबिरामध्ये डॉ. राज फुलबांदे व डॉ. गौतम गजभिये

यांनी उपस्थित रुग्णांना आहार, पाणी, हवा, निद्रा, सुर्यप्रकाश व व्यायाम यांच्या अभावाने होणऱ्या रोगाबद्दल दक्षता घेण्याबाबत व औषधोपचार हे माहित केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी. सोळंके यांनी केले. तर सुत्रसंचालन माजी विद्यार्थी व विद्यापीठ प्रतिनिधी सुरज दहाट याने तर आभार प्रदर्शन मंगेश तायडे यांनी केले होते.



**१३) महापरिनिवार्ण दिनानिमित्त श्रमदान :-**

महापरिनिवार्ण दिनी फक्त भाषणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासोबतच विधायक कार्य विद्यार्थ्यांना कसे करता येईल? तसेच श्रमप्रतिष्ठा कशी वाढवता येईल? यावर विचार मंथन विनिमय करुण उपस्थित विद्यार्थ्यांनी फोटोपुजन झाल्यावर श्रमदान करुन महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला.

मंगळवार दि. १५ डिसेंबरला २०१४-१५ च्या नियमीत कार्यक्रमांचे अनुदान २१४५० रु. व विशेष शिबिर अनुदान २२५० रु असे दोन चेक मिळाले. दोन्ही चेक रा.से.यो. खात्यामध्ये जमा केलेत. त्यानंतर प्राचार्य आणि कार्यक्रम अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्राप्त अनुदानाचा निधी चेक द्वारे कार्यक्रम अधिकारी यांचेकडे सुपुर्द करण्यात आला.

**१४) सायबर क्राईम व अंधश्रद्धा निर्मूलन विषयी कार्यक्रम:-**

सोमवार दि. १६ डिसेंबर २०१५ ला रा.से.यो. स्वयंसेवकांना मा. ठाणेदार श्री. ए. एल. लाड साहेब आणि बार्टी पुणेच्या अमरावती जिल्ह्यातील तीन महिला कमचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. मा. ए. एस. लाड साहेबांनी सायाबर क्राईमबाबत विद्यार्थ्यांना जागृत केले आणि

यापासून होणाऱ्या परिणामांची जाणीव करुन दिली. शेवटी विद्यार्थ्यांच्या शंका-कुशंका विचारुन त्याचे समाधान केले. बार्टीच्या महिला कर्मचाऱ्यांनी समाजातील अंधश्रद्धेवर प्रकाश टाकून समाजातील अंधश्रद्धा हद्दपार करण्यचे आव्हान केले होते. त्याकरिता अंधश्रद्धा फैलावणारे विश्वासघातकी असे अनेक प्रयोगही करुन दाखविले होते.

**१५) गाडगेबाबा पुण्यतिथी :-**

भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील इतिहास विभागाचे प्रा. डॉ. संदिप राऊत यांनी संत गाडगे बाबांची समाजप्रबोधन चळवळ ही विचार प्रबोधन मालिका एक महिन्याकरिता सुरू केली होती. त्याचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून सोमवार दि. २१ डिसेंबर २०१५ ला स्व.बबनदादा मेटकर यांचे स्मृतिपित्यर्थ कर्मयोगी संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमीत्त समाज प्रबोधन चळवळ आयोजित कार्यक्रमामध्ये प्रा.डॉ.संदीप एम.राऊत यांचे रा.से.यो. स्वयंसेवकासह इतरही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. शेवटी विद्यार्थ्यांकडूनसुद्धा काही प्रश्न विचारल्या गेलेत त्यांचेही समाधान झाले प्रा.एम.व्ही.जगताप या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सी.जी. सोळंके यांनी केली, तर आभार प्रा. रवि गावंडे यांनी केले. अशा प्रकारे हा कार्यक्रम पार पडला. होता शेवटी विद्यार्थ्यांचे तोंड गोड केले.

**१६) जीवनरथ मिरवणू व श्रमदान :-**

शिक्षण महर्षि, कृषिरत्न डॉ.पंजाबराव भाऊसाहेब देशमुख जयंती निमित्त महाविद्यालयामधून २७ डिसेंबर २०१६ ला सकाळी तिवसा गावाच्या मुख्य मार्गाने जीवनरथ मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणूकी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी संत गाडगे बाबा, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन झाले. प्रा.सी.जी. सोळंके यांनी मिरवणुकीदरम्यान अभिवादनापर संचालन व जीवनरथ मिरवणूकीची माहिती दिली. मिरवणूक समारोपानंतर विद्यार्थ्यांना नास्ता व चहा देण्याकरिता रा.से.यो. स्वयंसेवकांनी सहकार्य केले. समारोपाप्रसंगी प्राचार्य डी. एच. मेश्राम यांनी शिक्षक-विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सविस्तर सूचना दिल्यात व आपली जबाबदारी सांगितली.





**१७) कार्यशाळेला स्वयंसेवक प्रतिनिधी :-**

सोमवार दि. ११ जानेवारी २०१६ ला रा.से.यो. विद्यार्थी प्रतिनिधी गौरव पोलाड व कु.अश्विनी गोरडे बी.ए.२ हे दोन विद्यार्थी सं.गा.बा.अम.विद्यापीठामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यशाळेला पाठविले होते. या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये सहभाग घेतलाआणि कार्यशाळेमध्ये झालेल्या मार्गदर्शनाची संपूर्ण माहिती आत्मसात करून रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे वर्णन केली.

**१८) रा.से.यो. स्पर्धा परीक्षा कार्यशाळा:-**

मंगळवार दि. १२ जानेवारी २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजना आणि स्वामी विवेकानंद बहुद्देशिय सामाजिक संस्था यांचे सयुक्त विद्यमाने युवादिनाचे निमित्ताने स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे महाविद्यालयाच्या इंडोअर स्टेडियममध्ये आयोजन करण्यात आले होते.

मा. प्राचार्य डी.एच.मेश्राम यांचे अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा सपन्न झाली होती. मा. ठाणेदार ए.एल.लाड प्रोस्टे. तिवसा, मा. जी. एस. धामगुडे उच्च श्रेणी बी.डी.ओ.पं.सं. तिवसा, पी.एस.आय. शिंदे मॅडम यांनी उपस्थित रा.से.यो. स्वयंसेवक व विद्यार्थी यांना स्पर्धापरीक्षाबाबत सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा.वाघमारे, मा. कडू, मा. जगताप, मा. गावंडे, मा. भुयार, प्रा.सोळंके हे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये सरपंच मोझरी गुरूदेव नगर यांचेसह इतरही सन्माननीय व्यक्ती उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रविण राऊत यांनी सांभाळले.



**१९) शाळाबाह्य मुले सर्वेक्षण :-**

शनिवार दि. १६ जानेवारी ते शनिवार २३ जानेवारी २०१६ या आठवड्यामध्ये रा.से.यो.स्वयं सेवकांनी तिवसा गावालगतच्या पंचवटी बसस्थानकाशेजारी पालामध्ये राहणाऱ्या भटक्या लोकांच्या शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण केले. त्याचप्रमाणे इतर खेड्यांचे सर्वेक्षण करुन शिक्षण विभाग पं.स.तिवसा येथे प्राप्त माहिती सादर केली. या सर्वेक्षणाकरिता गटशिक्षणाधिकारी मा. निंघोट साहेब यांनी शासनाचा उपक्रम सांगितला. त्याप्रमाणे स्वयंसेवकांनी कार्य केले.

**२०) शिबिराबाबत रा.से.यो. सल्लागार समिती सभा :-**


बुधवार दि. १३ जानेवारी २०१६ आणि बुधवार दि. २० जानेवारी २०१६ मा. प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली विशेष शिबिर घ्यायचे की नाही? याबाबत दोन सभा घेण्यात आल्या होत्या. शिबिर घेण्याबाबत त्याचप्रमाणे इतरही विषयावर निर्णय घेण्यात आले होते. या सभेला कार्यक्रम अधिकारी महिला प्रा. डॉ. एस. एस. भूयार कार्यक्रम अधिकारी, प्रा. सी. जी. सोळंके माजी. म. का. अधिकारी डॉ. एन. आर. गिरी, सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. पी. काळे, सल्लगार समितीचे प्रा.एम.व्ही. जगताप त्याचप्रमाणे प्रा.डॉ. गायकवड हे सुद्धा उपस्थित होते. विद्यार्थी प्रतिनिधी गौरव पोलाड व कु.शुभांगी लांजेवार बी.ए.भाग २ हे सुद्धा सभेला उपस्थित होते.

**२१) रा.से.यो. स्वयंसेवक सभा :-**

गुरुवार दि. २१ जानेवरी २०१६ च्या सभेमध्ये दत्तक ग्राम शेंदोळा खुर्द येथे सलग दुसऱ्या वर्षी ही रा.से.यो. विशेष शिबिराचे आयोजन करण्याचे सर्वांना कळविले होते. शेवटी संबंधीत विद्यार्थ्यांचे विचार ऐकून घेऊन शिबिरामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून काही सुचनाही देण्यात आल्या होत्या. या सभेमध्ये रा.से.यो. स्वयंसेवकासह कार्यक्रम अधिकारी, महिला कार्यक्रम अधिकारी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, सल्लगार डॉ.गायकवाड हे उपस्थित होते.

**२२) वृद्धाश्रम व अनाथाश्रमामध्ये अन्नदान :-**

सोमवार दि. १५ फेब्रुवारी २०१६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी असलेले गुरुकुंज आश्रम येतील वृद्धाश्रम आणि बालगृहाकरिता अन्नदानाचा कार्यक्रम मा. प्राचार्य डी.एच.मेश्राम सर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केला होता.



अन्नदानापूर्वी छोटेखानी कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होत. याप्रसंगी बालगृह व वसतिगृहाचे गृहपाल, प्रामुख्याने उपस्थित होते. अन्नदानापूर्वी कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी.सोळंके व प्राचार्य डी.एच. मेश्राम सर यांनी वृद्ध व अनाथ बालकांशी सुसंवाद साधला, या सुसंवाद कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला या प्रसंगी रा.से.यो.चे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. शेंदोळा खु. चे ग्रा.पं. सदस्य आशिष निस्ताने यासह अनेकजन उपस्थित होते.

**२२) शिवजयंती उत्सव :-**

शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी २०१६ ला दत्तक गावातील रा.से.यो.च्या आजी-माजी स्वयंसेवकांनी शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दत्तक ग्राम शेंदोळा खु. येथील या कर्याक्रमाध्ये काही स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी आर्वजुन उपस्थित होते. यानंतर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी.सोळंके हे युवाशक्ती महाविद्यालय अमरावती यांचे विशेष शिबिर डवरगाव येथ मार्गदर्शन करण्यास गेले त्यांचे सोबत रा.से.यो. स्वयंसेवक गौरव पोलाड बी.ए. भाग २ चा विद्यार्थी सुद्धा प्रतिनिधीक स्वरूपात सहभागी झाला होता.

**२४) रक्तदान शिबिर :-**

सोमवार दि. २२ फेब्रुवारी २०१६ ला कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या जयंती दिनावर ठरविलेले रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये अकरा स्वयंसेवकांनी रक्तदान केले होते. एकूण चाळीस विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. परंतु पोलीस ठाणे तिवसा, आणि गावात इतर दोन ठिकाणी नोंदणी झालेलया विद्यार्थ्यांनी रक्तदान केले असल्याने महाविद्यालयातील रक्तदानास अकरा स्वयंसेवकांशिवाय रक्तदाते रक्त देऊ शकले नव्हते. त्याचप्रमाणे बऱ्याच स्वयंसेवक व स्वयंसेविकेनी रक्तदानाची इच्छा असून वजन उंची यामध्ये न बसल्याने त्यांना रक्तदान करता आले नव्हते. ही खंत त्यांनी व्यक्त केली होती.

**२५) गाडगे बाबा जयंती :-**

मंगळवार दि. २३ फेब्रुवारी २०१६ रा.से.यो.द्वारा आयोजित कर्मयोगी गाडगे बाबा जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालयात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाध्ये कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी. सोळंके आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.रविकांत महिंदकर आर्वजुन उपस्थित होते. अभ्यास व सराव परीक्षा तसेच क्लिअरन्स, या महत्त्वाच्या कामामध्ये विद्यार्थी गुंतलेले असल्याने विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाकडे आवश्यक असा सहभाग दिला नव्हता.

**२६) जागतिक महिला दिन :-** मंगळवार दि. ८ मार्च २०१६ ला रा.से.यो.ने डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंच तिवसा यांचे संयुक्त विद्यमाने गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला मेळाव्याचे' आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटिका नगराध्यक्षा सौ. राजकन्या खाकसे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून स्त्री

रोगतज्ञ डॉ. शिल्पा भूषण पाटील ह्या होत्या पणन महासंघ अध्यक्षा सौ.छायाताई दंडाळे, पोलिस उप निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे, तसेच नगर सेविका सौ. सुरजुसे माजी ग्रा.प.सदस्य अलका शापामोहन व नंदा यावले उपस्थित होत्या. या मेळाव्यामध्ये प्रमुख मार्गदशिका म्हणून महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संगीता भूयार आणि कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.जी.सोळंके हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे की, या महिला मेळाव्यामध्ये महिलांवर बोलण्याकरिता प्रा. सोळंके या एका पुरूष अतिथिला निमंत्रीत केले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज माहोर यांनी केले आणि सूत्रसंचालन कु. रोहिणी हांडे हिने केले तर आभार प्रदर्शन सागर भोवते यांनी केले. या कार्यक्रमाकरिता रा.से.यो. पथक व डॉ. बा. आ. विचार मंचाने परिश्रम घेतले होते..

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १२५ वी जयंती :-**

गुरूवार दि. १४ एप्रिल २०१६ ला भारतासह संपूर्ण जगामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी झाली. त्याचप्रमाणे रा.से.यो.चे माजी कार्यक्रम अधिकारी व प्रभारी प्राचार्य यांनी रा.से.यो. चे स्वयंसेवकांना एकत्रित करून प्रतिमा पुजन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी अशाच एका कार्यक्रमाकरिता गेले असल्याने मा. मेश्राम सर यांनी १२५ व्या जयंती छोटेखानी कार्यक्रमाने साजरी केली.